# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक १६.९.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ३१ :-** मौजा म्हासला सर्व्हे क्र. १६ येथील अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या जागेवर हेल्थ सेंटर व क्रिडांगणाचे वापरा करीता दिलेल्या परवानगीस मुदतवाढ देणे बाबत.

**ठराव क्रमांक ३१ :-** मौजा म्हासला सर्व्हे क्र. १६ येथील अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या एकुण ७२१३.५० चौ.मी. जागे पैकी ७२१.३५ चौ.मी. जागा अध्यक्ष, राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था (नॉफ) (र.जि.नं.महा.७०/८५/एनजीपी) अमरावती यांना हेल्थ सेंटर व क्रिडांगणाचे वापरा करीता दिनांक १६/१/१९९१ चे करारनामा नुसार ३० वर्षाचे कालावधी करीता देण्यात आले आहे. सदर करारनाम्याची मुदत दिनांक १६/१/२०२१ पर्यंत होती.

अर्जदार संस्थेने नाममात्र भाडे रुपये १०१/- प्रती वर्षा प्रमाणे ३० वर्षाचे भाडे रुपये ३०३० मनपा. मध्ये जमा केले आहे. आवेदक संस्थेने दिनांक ८/१/२०२१ (प्राप्त दिनांक ९/९/२०२२) चे पत्रा नुसार मुदत वाढ देण्या बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ४, दिनांक १६/३/२०२१ अन्वये मंजुर धोरणा मधील निर्णय क्रमांक ३:- पुर्वी ज्या प्रकरणी प्रचलित धोरणापुर्वी नाममात्र भाडे घेवून ज्या जागेवर परवानगी देण्यात आलेली आहे. त्या प्रकरणात परवानगी/करारनाम्यात जुन्या अटी शर्ती प्रमाणे नाममात्र भाडे आकारणी करुन पुढील मुदतवाढ देण्यात यावी. असे आहे. तसेच निर्णय क्रमांक ५.११:- प्रथम ३ वर्षा करीता देण्यात येईल. ३ वर्षात विकास केल्यास पुढील १० वर्षाकरीता मुदत वाढ द्यावी, असे आहे.

मंजुर UDCPR मधील तरतुदी नुसार सार्वजनिक वापराच्या जागेवर हेल्थ सेंटर व क्रिडांगणाचे चा वापर अनुज्ञेय आहे. सदर प्रकरणी कुठलेही हरकत प्राप्त नाही.

मंजुर धोरणा मधील निर्णय क्रमांक ३ व ५.११ नुसार नाममात्र शुल्क रुपये १०१/- प्रती वर्ष घेवुन, पुढील १० वर्षा करीता मुदतवाढ देण्याचे प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दिनांक १६/९/२०२२ रोजीला मंजुरी दिलेली आहे.

सबब विषयांकीत प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करणे करीता विषय सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका,अमरावती

स्वा/-
प्रशासक,
महानगरपालिका,अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती